4 AUG 2004

मुख्य अभियंता
सा. बां. प्रादेशिक विभाग, पुणे

**<u>रोजगार हमी योजना</u>**
नियोजनबाहय रस्त्यांची कामे
रोहयो अंतर्गत घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग
शासन परिपत्रक क्र. रोहयो-२००४/प्र.८८/रोहयो-६
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक १० ऑगस्ट, २००४.

**प्रस्तावना :**

ग्रामीण रस्ते हे साधारणतः अस्तित्वातील पाणंदी, गाडी रस्ता, पाऊलवाटा यावरुनच घेतले जातात. अशा रस्त्यासाठी रोजगार हमी योजनेखाली जमीन संपादन करण्याची तरतूद नाही. अस्तित्वातील रस्त्याची रुंदी कमी असल्यास दानपत्राने शेतक-याकडून अतिरिक्त जमीन उपलब्ध करुन घेण्यात येते. रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत नियोजनातील व नियोजन बाहय रस्त्यांची कामे हाती घेतली जातात. जिल्हा पातळीवर रोहयोखाली नियोजनबाहय कामे घेत असताना काही ठिकाणी बाजूच्या रस्त्यास समांतर रस्ते आवश्यकता नसताना प्रस्तावित करण्याची शक्यता नाकारता येत नाही. साधनांची कमतरता लक्षात घेता नियोजनबाहय रस्ते प्रस्तावित करताना त्याची निकड इत्यादीचा बारकाईने तपास करुन निर्णय घेणे आवश्यक ठरते.

यास्तव रस्त्यांच्या प्रस्तावांवर प्रभावी संनियंत्रण करण्यासाठी जिल्हा पातळीवर एक स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्यासाठी खालील सूचना देण्यात येत आहेत.

**<u>परिपत्रक :-</u>**

प्रत्येक जिल्हा पातळीवर नियोजनातील रस्त्यांचा आराखडा व रस्त्यांची यादी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्थायी मुख्यालय विभागात उपलब्ध असते. इतर म्हणजे नियोजनबाहय रस्त्यांची (वाडया, तांडे, पाडे याना मूळ गावाशी जोडणारे रस्ते, शेताकडे जाणारे रस्ते, स्मशानभूमी, आश्रमशाळा, आरोग्यकेंद्र, सार्वजनिक पाणवठ्याकडे जाणारे रस्ते, वन वापरासाठीचे रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते इत्यादी) कामे रोजगार हमी योजनेखाली घेण्यासाठी जिल्हाधिका-यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थायी विभाग आणि कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद(बांधकाम), मुख्यालय विभाग या दोघांची एक समिती निर्माण करण्यात यावी. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग हे या **समितीचे समन्वय अधिकारी** म्हणून काम करतील.

२. रोजगार हमी योजनेखाली हाती घ्यावयाच्या रस्त्यांचे जे प्रस्ताव जिल्हाधिका-यांकडे प्रशासकीय मान्यतेसाठी येतात ते वरील समितीकडे पाठवून त्यांची छाननी करुन घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याविषयी योग्य ती कार्यवाही करावी.

३. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावांवर समितीने शक्यतो एका आठवडयात छाननी करुन योग्य ती शिफारस करावी.

३. प्रस्तावित **रस्ते नियोजनातील आहेत की नियोजनबाहय आहेत, नवीन आहेत वा पूर्वी इतर कोणत्या योजनेखाली करण्यात आलेले आहेत या विषयी जिल्हा पातळीवरील उपलब्ध आराखडयानुसार/माहितीनुसार तपासणी करावी. प्रस्तावित रस्ता हा सरकारी जमिनीतून जात आहे का, गावे, पाडे वा इतर महत्वाची ठिकाणे जोडण्यासाठी याची आवश्यकता आहे का हे पहावे. अस्तित्वातील रस्त्यावरुन रस्ता प्रस्तावित केला असल्यास त्यासाठी पुरेशी जमीन उपलब्ध आहे का, दानपत्राने अतिरिक्त लागणारी जमीन उपलब्ध होणार आहे का, अस्तित्वातील रस्त्याचा प्रकार व त्याची रुंदी इत्यादी बाबींवर पण कार्यान्वयीन यंत्रणेबरोबर चर्चा करुन याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे समितीने स्पष्ट शिफारस करावी.** अस्तित्वातील रस्त्याच्या रुंदीबाबत संबंधित तहसिलदार यांचा अहवाल घेण्यास हरकत नाही. कार्यान्वयीन यंत्रणेने सुध्दा प्रस्तावासोबत वरील सर्व माहितीचा उल्लेख करावा. **प्रस्तावित रस्ता रोजगार हमी योजनेखाली हाती घेण्याची गरज व यापूर्वी हा रस्ता कोणत्याही निधीतून केला गेला नाही याबाबतचे प्रमाणपत्र कार्यान्वयीन यंत्रणेने द्यावे.**

४. आतापावेतो रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेल्या नियोजनातील व नियोजनबाहय रस्त्यांची यादी जिल्हा पातळीवर अद्ययावत करण्यात यावी. यापुढे जे नवीन रस्ते तयार होतील त्यांची कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग) पातळीवर नोंदवहीत नोंद घेण्यात यावी. अशा नवीन घेतलेल्या नियोजनबाहय रस्त्यांची यादी वेळोवेळी जिल्हाधिकारी व रस्ते प्रकल्प विभागाकडे पाठविण्यात यावी. जिल्हाधिकारी कार्यालयातील रोजगार हमी योजना शाखेने प्रशासकीय मान्यतेच्या नोंदवहीवरुन व आजपावेतो मंजूरी दिलेल्या सर्व रस्त्यांची यादी एका स्वतंत्र नोंदवहीत क्रमवार पध्दतीने नोंदवावी व ती यापुढे रस्ते मंजूरी निहाय अद्यावत करावी.

५. गावाना, वाडयांना, पाडयांना व अन्य काही महत्वाच्या ठिकाणांना जवळच्या वेगळया मार्गाने यापूर्वीच जोडलेले असेल तर पुन्हा नवीन समांतर रस्ता रोजगार हमी योजनेखाली घेण्यात येऊ नये. जी ठिकाणे **अद्याप जोडलेली नसतील त्यांना रोजगार हमी योजनेखाली प्राधान्यक्रम द्यावा.** काही रस्ते हे विशेषतः पाणंदीतून, भरावातून जात असल्यामुळे अशा रस्त्यासाठी जास्त रुंदी लागते. अशा ठिकाणी रस्त्यासाठी दानपत्राने शेतक-याकडून जमीन न मिळाल्यामुळे रस्ता अर्धवट पणे पडून राहतो. असे होऊ नये

म्हणून रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यापूर्वीच दोन गावांना जोडणा-या **रस्त्यांची पूर्ण लांबीतील व पूर्ण रुंदीतील जमीन उपलब्ध होण्याबद्दलची खात्री सुरुवातीलाच करावी** व नंतरच रस्त्याचे काम हाती घ्यावे.

६. रोजगार हमी योजनेखाली घ्यावयाच्या प्रत्येक रस्त्याबाबत समितीकडून वरील बाबींची छाननी करुन समितीची स्पष्ट अशी शिफारस घ्यावी व त्यानंतर इतर सर्व अनुषंगिक बाबींचा एकत्रित विचार करुन प्रशासकीय मंजूरीचा निर्णय घ्यावा. **एकाच रस्त्याची दोन विभागाकडून स्वतंत्र अंदाजपत्रके होऊन त्याला मंजूरी प्रदान न होण्याची, तोच रस्ता परत रोजगार हमी योजनेखाली न घेण्याची इत्यादी घटना टाळाव्यात.** रस्त्याच्या प्रकारानुसार गावरस्ता, इतर जिल्हा रस्ते, तसेच नियोजनातील व नियोजनबाहय रस्ते इत्यादी नुसार समितीने रस्त्यास लागणा-या जमिनीच्या रुंदीबद्दल (रस्त्याच्या वेगवेगळया भागासाठी) स्पष्ट असे भाष्य करावे. दोन ठिकाणांना जोडणा-या रस्त्याचे एकच अंदाजपत्रक बनवावे. अंदाजपत्रक तुकडया तुकडयाने बनवू नये. अंदाजपत्रक बनविताना सविस्तर सर्वेक्षण करुन दर ३० मीटरला काटछेद (Cross section) घेवून रस्त्याचा L-section काढून मातीकामाचे (भराव, खोदाई) परिमाण अचूक काढावे. साहित्यासाठी लागणा-या खाणीचे पण अंतर प्रथम तपासून निश्चित करावे. यामुळे काम करीत असताना रस्त्याच्या परिमाणात अवास्तव बदल होणार नाही. याची सर्व जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेवर राहील.

वेगवेगळया प्रकारच्या रस्त्यांबद्दलची तांत्रिक मानके/निकष हे वेगळया परिपत्रकाने स्वतंत्रपणे वितरित करण्यात येत आहेत.

(दि.मा. मोरे)
मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो)

जा.क्र.का-२/रस्ते/पुणे/५६१४/२००४

मुख्य अभियंता
सा.बां.प्रा.वि. पुणे
यांचे कार्यालय पुणे-१
दिनांक

प्रति,
अधीक्षक अभियंता
सा.बां.मंडळ पुणे/सातारा/कोल्हापूर/सोलापूर यांना
माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

सहाय्यक मुख्य अभियंता,
पुणे सा. बां. प्रादेशिक विभाग,
पुणे